महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.


जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/२०२१-२०२२/ ९९९८

दिनांक : 10 MAR 2022

प्रति,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित (पदवी/पदव्युत्तर/पदविका) संस्था
पुणे विभाग

**विषय** - मराठी भाषा धोरण अंमलबजावणी .....

**संदर्भ** – १) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनाल, मुंबई यांचे पत्र क्र १६/आस्था/संकिर्ण/२०२१/८७
दि. ०८-०३-२०२२

२) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनाल, मुंबई यांचे पत्र क्र १६/आस्था/संकिर्ण/२०२१/३६०
दि. २९-१२-२०२१

३) शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग पत्र क्र.संकिर्ण २०२१/प्र.क्र ११०/विशि ५. दि. २८-११-२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधिन पत्रान्वये कळविणेत येते की, महाराष्ट्र राज्यभाषा (सुधारणा) अधिनियम २०२१ दि. १६-०७-२०२१ च्या राजपत्रान्वये प्रसिध्द करण्यात आला असून राज्य शासकीय कार्यालये व त्या अंतर्गत व्यवहार, कामकाज तसेच राज्यातील जनतेशी करावयाचा पत्रव्यवहार व संदेशवहन मराठी भाषेतून बंधनकारक करण्यात आलेले आहे. मराठी भाषा (सुधारणा) अधिनियम २०२१ केंद्र शासनाच्या नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने राज्य शासनाच्या मराठी भाषा धोरणातील उच्च शिक्षणाशी संबंधीत मुद्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्यामुळे पत्रान्वये नमूद मुद्यांबाबतची तातडीने अंमलबजावणी_करण्याच्या दृष्टीने विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर उचित कार्यवाही करण्याचे निर्देश शासनामार्फत देण्यात आलेले आहे. शासनामार्फत देणेत आलेल्या निर्देशांनुसार **आपल्याशी संबंधीत नमूद मुद्यांबाबतची तातडीने अंमलबजावणी** करुन आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास दोन दिवसात तात्काळ या ई-मेल- ropune@dtemaharashtra.gov.in वर अथवा हस्तपोच सादर करावा.

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

सोबत - वरिलप्रमाणे
प्रत -: या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

अतितात्काळ

पत्र क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०२१/ ८७ ,
ईमेलद्वारे

दिनांक : 8 MAR 2022

प्रति,

१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

२. सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय : मराठी भाषा धोरण अंमलबजावणी..

संदर्भ : शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग पत्र क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र.११०/विशि५, दि.२६.११.२०२१ तसेच या संचालनालयाचे पत्र व ईमेल दि.२१.१२.२०२१

उपरोक्त विषयाची संदर्भाधीन पत्रे व ईमेल पहावेत.

प्रस्तुत पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम २०२१, दि.१६.०७.२०२१च्या राजपत्रान्वये प्रसिध्द करण्यात आला असून राज्य शासकीय कार्यालये व त्याअंतर्गत व्यवहार, कामकाज तसेच राज्यातील जनतेशी करावयाचा पत्रव्यवहार व संदेशवहन मराठी भाषेतून बंधनकारक करण्यात आलेले आहे. मराठी राजभाषा (सुधारणा) अधिनियम २०२१ केंद्र शासनाच्या नवीन शैक्षणिक धोरण २०२०च्या अनुषंगाने राज्य शासनाच्या मराठी भाषा धोरणातील उच्च शिक्षणाशी संबंधीत मुद्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्यामुळे पत्रामध्ये नमूद मुद्यांबाबतची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर उचित कार्यवाही करण्याचे निर्देश शासनामार्फत देण्यात आलेले आहे. शासनामार्फत देण्यात आलेल्या निर्देशांनुसार आवश्यक ती कार्यवाही तातडीने करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास तात्काळ सादर करण्याचे कळविण्यात आले होते. तथापी, अद्यापी, आपला अहवाल अप्राप्त आहे.

करीता प्रस्तुत अहवाल दि.१०.०३.२०२२ पर्यंत या संचालनालयास सादर करावा.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
10 MAR 2022
२३८७

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :
कार्यासन अधिकारी, संचालनालयातील सर्व कार्यासने

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

अतितात्काळ

पत्र क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०२१/ ३ ६८ — दिनांक : 21 DEC 2021

ईमेलव्दारे

प्रति,

१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

२. सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय : मराठी भाषा धोरण अंमलबजावणी..
संदर्भ : शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग पत्र क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र.११०/विशि५, दि.२६.११.२०२१

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र कृपया पहावे. त्वरित संदर्भासाठी प्रत सोबत जोडली आहे.

प्रस्तुत पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम २०२१, दि.१६.०७.२०२१च्या राजपत्रान्वये प्रसिध्द करण्यात आला असून राज्य शासकीय कार्यालये व त्याअंतर्गत व्यवहार, कामकाज तसेच राज्यातील जनतेशी करावयाचा पत्रव्यवहार व संदेशवहन मराठी भाषेतून बंधनकारक करण्यात आलेले आहे. मराठी राजभाषा (सुधारणा) अधिनियम २०२१ केंद्र शासनाच्या नवीन शैक्षणिक धोरण २०२०च्या अनुषंगाने राज्य शासनाच्या मराठी भाषा धोरणातील उच्च शिक्षणाशी संबंधीत मुद्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्यामुळे पत्रामध्ये नमूद मुद्यांबाबतची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर उचित कार्यवाही करण्याचे निर्देश शासनामार्फत देण्यात आलेले आहे. शासनामार्फत देण्यात आलेल्या निर्देशांनुसार आवश्यक ती कार्यवाही तातडीने करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास तात्काळ सादर करावा.

( वर्षा संदीप गुजरे )
सहाय्यक संचालक(तां.),
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :
कार्यासन अधिकारी, संचालनालयातील सर्व कार्यासने

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्र. ४२२,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई — ३२.
Email ID : kishor.jakate@nic.in दूरध्वनी क्र. ०२२-२२७९३१७१

क्र. संकीर्ण-२०२१/प्र. क्र. ११०/विशि-५ दि. २६/११/२०२१

पत्र प्राप्त झाले
14 DEC 2021

प्रति,

**कुलसचिव,**
**सर्व अकृषि विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/**
**स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे**

**विषय : मराठी भाषा धोरण अंमलबजावणी.**

महोदय,

महाराष्ट्र राज्यात मराठी भाषेचे संरक्षण, संवर्धन व विकास होण्याच्या दृष्टीने भाषा सल्लागार समितीने राजभाषा मराठी धोरणाचा प्राथमिक मसुदा शासनाकडे सादर केला होता. शासनाने हा मसुदा जनतेच्या माहितीसाठी व सूचना प्रतिक्रियांसाठी शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिला.याबर विद्यापीठ स्तरावर झालेल्या चर्चासत्रांदरम्यान भाषातज्ञ, महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचना तसेच या धोरणाच्या अंमलबजावणीसंदर्भात स्थापन केलेल्या उपसमित्यांच्या अहवालाचा विचार करुन मराठी भाषा विभागाने मराठी भाषा धोरण तयार केलेले आहे. सदर धोरणातील काही मुद्दे उच्च शिक्षणाशी संबंधित आहेत.

महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ दि. १६ जुलै, २०२१ च्या राजपत्रान्वये प्रसिध्द करण्यात आला असून याद्वारे राज्य शासकीय कार्यालये तसेच त्याअंतर्गत व्यवहार, कामकाज तसेच राज्यातील जनतेशी करावयाचा पत्रव्यवहार व संदेशवहनमराठी भाषेतून बंधनकारक करण्यात आले आहे.

मराठी राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१, केंद्र शासनाच्या नविन शैक्षणिक धोरण-२०२० च्या अनुषंगाने राज्य शासनाच्या मराठी भाषा धोरणातील उच्च शिक्षणाशी संबंधित मुद्यांवर तातडीने कार्यवाही

करण्याची आवश्यकता आहे.सबब, खाली नमूद मुद्यांची तातडीनेअंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर विहित पध्दतीने उचित कार्यवाही करावी.

| अ.क्र. | मराठी भाषा धोरणातील मुद्यांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही |
|---|---|
| १ | राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठे यांच्या प्रशासकीय कामकाजात इंग्रजीसोबत मराठीचाही वापर अनिवार्य असेल. तसेच त्यांच्या परिसरातील, वास्तूंतील नावे, सूचनाफलक इत्यादी सर्व बाबतीत मराठी भाषेचा ठळकपणे वापर करणे बंधनकारक राहील.<br>विभागाच्या दि. ०७/०५/२०१८ च्या परिपत्रकान्वये याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. या सूचनांची अंमलबजावणी होते किंवा कसे याबाबत संबंधित सहसंचालकांनी तपासणी करावी. |
| २ | राज्यातील सर्व प्रकारची महाविद्यालये तसेच विद्यापीठे यांची संकेतस्थळे तसेच त्यातील माहिती मराठी भाषेतही उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांनी उचित कार्यवाही करावी. |
| ३ | राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठे यांनी, त्यांना अनुदान आयोगासारख्या नियामक संस्थांकडून संशोधनासाठी मिळणाऱ्या निधींपैकी यथोचित निधी विविध ज्ञानशाखांतील मराठी भाषेतून होणाऱ्या संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी खर्च करण्याबाबत उचित कार्यवाही करावी. |
| ४ | राज्यातील सर्व विद्यापीठे आणि संशोधन संस्था यांच्यामार्फत प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांमधून मराठी भाषेतील शोधनिबंध प्रसिध्द करण्याबाबत उचित कार्यवाही करावी. |
| ५ | महाविद्यालयांतील व विद्यापीठांतील अमराठी विद्यार्थ्यांना मराठी शिकण्यासाठी उत्तेजन देण्यात यावे तसेच त्यांच्या अध्यापनाची सोय करण्यात यावी. |
| ६ | सर्व विद्यापीठाच्या मराठी भाषा विभागामार्फत,मराठी संस्कृतीचा परिचय करुन देणारा अभ्यासक्रम सर्व विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना मराठी व इंग्रजी भाषांमधूनउपलब्ध करुन देण्याबाबत उचित कार्यवाही करण्यातयावी. |
| ७ | मराठी ज्ञानभाषा होण्याच्या दृष्टीने राज्यातील महाविद्यालये तसेच विद्यापीठे यांच्यातर्फे आयोजित चर्चासत्रे, परिषदा, कार्यशाळा, परिसंवाद आदि उपक्रमात, मराठी भाषेचा कटाक्षाने वापर केला जावा, यासाठी महाविद्यालये व विद्यापीठे यांनी उचित कार्यवाही करावी. |
| ८ | महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय पातळीवर मराठी साहित्य या विषयाबाबतच्या अभ्यासक्रमामध्येमराठी भाषेचा इतिहासया प्रकरणाचा समावेश करण्यात यावा. |
| ९ | एम.फिल. व पीएच.डी. चे प्रबंध मराठीमधून सादर करताना ते एकसंकेत (युनिकोड) प्रणालीतून सादर करणे अनिवार्य करण्यात यावे. तसेच या संबंधातील संशोधचौर्य तपासण्यासाठी विशिष्ट प्रणाली विकसित करण्यात यावी. |

| | |
|---|---|
| १० | मुलांच्या भाषिक विकासातील बालसाहित्याचे स्थान व महत्त्व लक्षात घेऊन बालसाहित्य या साहित्यप्रकाराकडे स्वतंत्र अभ्यास शाखा म्हणून उच्च शिक्षण व विद्यापीठीय स्तरावर मराठी बालसाहित्य या विषयाचा स्वतंत्र अभ्यासविषय म्हणून समावेश करण्यात यावा. |

सर्व विद्यापीठांनी तातडीने याबाबत कार्यवाही करावी तसेच त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांना अंमलबजावणी करण्याबाबत उचित निर्देश द्यावेत. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३१ डिसेंबर, २०२१ पूर्वी संचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत एकत्रित शासनास सादर करावा.

आपला,

(अजित म. बाविस्कर)
उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय
~~२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय~~
३) संचालक, कला संचालनालय

## मराठी भाषा धोरण कृतिआराखडा

## ५.१.३ उच्च शिक्षण

| अ.क्र. | मराठी भाषा धोरणातील मुद्दा क्र. | मराठी भाषा धोरणातील मुद्दे | अभिप्राय |
|---|---|---|---|
| २२. | ५.१.३.१ | राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठे यांच्या प्रशासकीय कामकाजात इंग्रजीसोबत मराठीचाही वापर अनिवार्य असेल. तसेच त्यांच्या परिसरातील, वास्तूंतील नावे, सूचनाफलक इत्यादी सर्व बाबतीत मराठी भाषेचा ठळकपणे वापर करणे बंधनकारक राहील. | याबाबतच्या सूचना विभागाच्या दि. ०७/०५/२०१८ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत.यानुसार कार्यवाही होते किंवा कसे याबाबत विभागीय सह संचालकांनी तपासणी करण्याबाबत दि. २६/११/२०२१ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. |
| २३. | ५.१.३.२ | राज्यातील सर्व प्रकराची महाविद्यालये तसेच विद्यापीठे यांची संकेतस्थळे मराठी भाषेतही उपलब्ध करुन देणे बंधनकारक केले जाईल. | सर्व विद्यापीठे तसेच महाविद्यालयांना संकेतस्थळे व त्यावरील माहिती मराठी भाषेतही उपलब्ध करुन देण्याबाबत दि. २६/११/२०२१ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. |
| २४. | ५.१.३.३ | राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठे यांनी, त्यांना अनुदान आयोगासारख्या नियामक संस्थांकडून संशोधनासाठी मिळणाऱ्या निधींपैकी यथोचित निधी विविध ज्ञानशाखांतील मराठी भाषेतून होणाऱ्या संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी खर्च करावा याकरिता पाठपुरावा केला जाईल. | विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त होणाऱ्या निधीपैकी काही निधी मराठी भाषेतील संशोधनासाठी खर्च करावा याबाबत सर्व विद्यापीठांना दि. २६/११/२०२१ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. |
| २५. | ५.१.३.४ | मराठीला ज्ञानभाषा करण्यासाठी वेगवेगळ्या विषयांच्या ग्रंथांची गरज आहे. ते निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाचे पुनरुज्जीवन करण्यात येईल. | या विषयावरील तज्ञ व्यक्तींची समिती नेमूण समितीच्या शिफारशीनुसार विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी उचित कार्यवाही करण्यात येईल. |
| २६. | ५.१.३.५ | राज्यातील सर्व विद्यापीठे आणि संशोधन संस्था यांच्यामार्फत प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांमधून मराठी भाषेतील शोधनिबंध प्रसिध्द करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात येईल व अशा संस्थांचे शैक्षणिक मूल्यमापन करताना या कार्याची योग्य ती दखल घेतली जाईल. | याबाबतच्या सूचना सर्व विद्यापीठांना दि. २६/११/२०२१ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत. |

| | | | |
|---|---|---|---|
| २७. | ५.१.३.३ | महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमातील तरतुदींनुसार महाविद्यालयीन व विद्यापीठीय उच्च शिक्षण मराठीतूनही उपलब्ध करुन दिले जाईल. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये "मराठी भाषा व साहित्य जतन व संवर्धन मंडळ" स्थापन करण्याबाबत सुधारणा प्रस्तावित असून सदर मंडळामार्फत याबाबत कार्यवाही करण्यात येईल. |
| २८. | ५.१.३.७ | विज्ञान आणि तंत्रज्ञानविषयक उच्च शिक्षण मराठी माध्यमातून उनलब्ध केले जाईल. | महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने शै.व. २०२१-२२ पासून प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांमध्ये अध्यापनाची प्रक्रिया मराठी-इंग्रजी (द्विभाषिक) भाषेमध्ये राबविण्याकरिता संस्थांनी पर्याय देण्याबाबतचे परिपत्रक दिनांक १३/०७/२०२१ रोजी निर्गमित केले आहे.<br>त्यानुसार शै.व. २०२१-२२ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता प्राप्त आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नीत असलेल्या अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांपैकी इच्छुकसंस्थांकडून प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रथम वर्षाकरीता मराठी-इंग्रजी या माध्यमातून अभ्यासक्रमनिहाय पर्याय घेऊन अशा संस्थांमध्ये मराठी-इंग्रजी (द्विभाषिक) अध्यापन प्रक्रिया मंडळामार्फत राबविण्यात येत आहे.<br>अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यताप्राप्त राज्यातील एकूण ३५२ अभियांत्रिकी पदविका संस्थांपैकी १७९ पदविका संस्थांनी मराठी-इंग्रजी (द्विभाषिक) या माध्यमातून अध्यापन प्रक्रिया राबविण्याबाबत इच्छुकता दर्शविली आहे.<br>उपरोक्तप्रमाणे १७९ संस्थांनी मराठी-इंग्रजी द्विभाषेचा पर्याय अध्यापनासाठी निवडलेला होता त्या संस्थांची माहिती मंडळाकडून तंत्रशिक्षण संचालनालयास प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाकरिता उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानुसार तंत्रशिक्षण संचालनालयाकडून प्रथम वर्षाची प्रवेश प्रकिया पूर्ण झालेली आहे.<br>प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना प्रथम सत्रात Basic Science (२२१०२) व Basic Mathematics (२२१०३) या दोन विषयाची |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | साधनसामुग्री मराठीतून तयार करुन मंडळाने दिनांक २९/०९/२०२१ रोजीच्या परिपत्रकांन्वये विद्यार्थी व अध्यापकांना मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच ज्या संस्थांनी मराठी-इंग्रजी द्विभाषेचा पर्याय दिलेला होता त्या संस्थांमध्ये त्याबाबतची अंमलबजावणी सुरू आहे. सबब, या मुद्यासंदर्भात विभागाकडून अंमलबजावणीस सुरुवात झालेली आहे. |
| २९. | ५.१.३.८ | विज्ञान आणि तंत्रज्ञानविषयक इंग्रजी भाषांतील ग्रंथांचे आणि नियतकालिकांमधील निबंधांचे विद्यापीठांमार्फत मराठीत भाषांतर केले जाईल. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये "मराठी भाषा व साहित्य जतन व संवर्धन मंडळ" स्थापन करण्याबाबत सुधारणा प्रस्तावित असून सदर मंडळामार्फत याबाबत कार्यवाही करण्यात येईल. |
| ३०. | ५.१.३.९ | लोकभाषा, राजभाषा मराठीची ज्ञानभाषा म्हणून जडणघडण आणि विकास करण्याची महत्त्वाची जबाबदारी उच्च शिक्षणामधून अपेक्षित आहे. विद्यापीठ अधिनियमानुसार राज्यातील विद्यापीठांनी सर्व प्रकारचे उच्च शिक्षण इंग्रजीप्रमाणे मराठी भाषेतूनही उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पार पाडावयाची आहे. ही जबाबदारी पार पाडली जात आहे की नाही हे तपासणारी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नाही. हे लक्षात घेऊन मराठी भाषा विभागामार्फत राज्यातल सर्व प्रकारच्या विद्यापीठांशी संलग्नित आणि स्वायत्त महाविद्यालयांची दर ३ वर्षांनी मराठी भाषा लेखापरीक्षा (मराठी लँग्वेज ऑडिट) करण्यात येईल.<br>या भाषा लेखापरीक्षेनुसार वरील संस्थांना मानांकाने दिली जातील आणि अर्थसहाय्य व सवलती देताना या मानांकनांचा विचार केला जाईल. | राज्यातील विद्यापीठे/महाविद्यालये यांचे मराठी भाषा लेखापरीक्षण मराठी भाषा विभागाकडून करण्यास व त्याप्रमाणे मानांकने देण्यास उच्च व तंत्र शिक्षण विभागाची हरकत नाही. |
| ३१. | ५.१.३.१० | उच्च शिक्षणात व्यावहारिक व उपयोजनलक्ष्यी शाखानिहाय मराठी भाषेच्या अध्यापनाची व्यवस्था करण्यात येईल. | याबाबत पथदर्शी प्रकल्प म्हणून एका विद्यापीठामध्ये अध्यापनाची व्यवस्था करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२. | ५.१.३.११ | महाविद्यालयांतील व विद्यापीठांतील अमराठी विद्यार्थ्यांना मराठी शिकण्यासाठी उत्तेजन दिले जाईल आणि त्यासाठी अध्यापनाची सोय केली जाईल. | याबाबत सर्व विद्यापीठांना दि. २६/११/२०२१ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. |
| ३३. | ५.१.३.१२ | मराठी संस्कृतीचा परिचय करुन देणारा अभ्यासक्रम सर्व विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना मराठी व इंग्रजी भाषांमधून उपलब्ध करुन देण्यात येईल. | सर्व विद्यापीठातील मराठी भाषा विभागामार्फत असा अभ्यासक्रम तयार करुन तो सर्व विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याबाबत दि. २६/११/२०२१ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. |
| ३४. | ५.१.३.१३ | मराठी ज्ञानभाषा होण्याच्या दृष्टीने राज्यातील महाविद्यालये तसेच विद्यापीठे यांच्यातर्फे आयोजित चर्चासत्रे, परिषदा, कार्यशाळा, परिसंवाद आदि उपक्रमात, मराठी भाषेचाही वापर केला जावा, यासाठी महाविद्यालये व विद्यापीठे यांना निर्देश दिले जातील. | याबाबत सर्व विद्यापीठांना दि. २६/११/२०२१ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. |
| ३५. | ५.१.३.१४ | महाराष्ट्र राज्यातील विविध महाविद्यालयांतील तसेच विद्यापीठांतील मराठी विभागातील रिक्त पदे भरण्यात येतील आणि शासनाच्या संमतीशिवाय कोणत्याही महाविद्यालयांतील व विद्यापीठांतील मराठी भाषा विभाग बंद करण्यात येणार नाही. | रिक्त भरण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात येईल. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर उचित कार्यवाही करण्यात येईल. |
| ३६. | ५.१.३.१५ | विद्यापीठीय व्यवहारात मराठी भाषेचा समुचित वापर होण्याच्या दृष्टीने कृषि आणि कृषीतर विद्यापीठांमध्ये मराठी भाषा अधिकारी नियुक्त केला जाईल. | महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) विधेयक, २०२१ मधील कलम ५(ज) अन्वये विद्यापीठातील सुयोग्य अधिकाऱ्यास मराठी भाषा अधिकारी म्हणून पद निर्देशित करण्याबाबत सर्व विद्यापीठांना सूचना देण्यात येतील. |
| ३७. | ५.१.३.१६ | व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, तंत्रशिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्यातर्फे देवनागरी मुद्राक्षर तंत्रज्ञान व त्याचे उपयोजन यासंबंधीच्या अभ्यासक्रमाचा उपलब्ध पाठ्यक्रमांमध्ये समावेश केला जाईल. | सदर बाब तंत्रशिक्षण संचालनालय यांच्याकडून तपासून घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करण्यात येईल. |
| ३८. | ५.१.३.१७ | महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय पातळीवर मराठी साहित्याच्या इतिहासाप्रमाणेच मराठी भाषेच्या इतिहासाचे अध्यापन केले जाईल. | मराठी साहित्य या विषयाबाबतच्या अभ्यासक्रमामध्ये मराठी भाषेचा इतिहास या प्रकरणाचा समावेश करण्याबाबत सर्व विद्यापीठांना दि. २६/११/२०२१ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३९. | ५.१.३.१८ | उच्च शिक्षणात... मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन केवळ साहित्यलक्ष्यी व पारंपरिक पाठ्यक्रमापुरते सीमित न ठेवता तो व्यवसायाभिमुख, रोजगाराभिमुख व कौशल्याभिमुख केले जाईल. | मराठी भाषेचे अध्ययन व्यवसायाभिमुख, रोजगाराभिमुख व कौशल्याभिमुख होण्याच्या दृष्टीने मराठी भाषा व साहित्य जतन व संवर्धन मंडळ या विद्यापीठातील प्रस्तावित मंडळामार्फत उचित कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व विद्यापीठांना देण्यात येतील. |
| ४०. | ५.१.३.१९ | सर्व राष्ट्रीय स्पर्धा परीक्षा, अभ्यासक्रम प्रवेश परीक्षा देताना प्रश्नपत्रिका मराठी भाषेत उपलब्ध व्हावी तसेच उत्तराची भाषा म्हणून मराठी भाषेचा पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी शासन मागणी व पाठपुरावा करील. | याबाबत मराठी भाषा विभागाने पाठपुरावा करावा. |
| ४१. | ५.१.३.२० | एम.फिल. व पीएच.डी. चे प्रबंध मराठीमधून सादर करताना ते एकसंकेत (युनिकोड) प्रणालीतून सादर करणे अनिवार्य केले जाईल. तसेच या संबंधातील संशोधचौर्य तपासण्यासाठी विशिष्ट प्रणाली विकसित करावी असे विद्यापीठांना निर्देशित केले जाईल. | याबाबत सर्व विद्यापीठांना दि. २६/११/२०२१ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. |
| ४२. | ५.१.३.२१ | मुलांच्या भाषिक विकासातील बालसाहित्याचे स्थान व महत्त्व लक्षात घेऊन बालसाहित्य या साहित्यप्रकारकडे स्वतंत्र अभ्यास शाखा म्हणून पाहिले जाईल व उच्च शिक्षण व विद्यापीठीय स्तरावर मराठी बालसाहित्य या विषयाचा स्वतंत्र अभ्यासविषय म्हणून समावेश करण्यात येईल. बालसाहित्याचे सर्वांगीण संशोधन व तौलनिक अभ्यास यांचा अंतर्भाव त्यात केला जाईल. | याबाबत सर्व विद्यापीठांना दि. २६/११/२०२१ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. |
| ४३. | ५.१.३.२२ | खाजगी रुग्णालयातील परिचारिकांना मराठीत संवादात्मक प्रशिक्षण देणे अनिवार्य केले जाईल. | याबाबत मराठी भाषा विभागाने कार्यवाही करावी. |
| ४४. | ५.१.३.२३ | परिचारिकांच्या अभ्यासक्रमात संवादात्मक मराठी प्रशिक्षणाचा समावेश केला जाईल. | याबाबत मराठी भाषा विभागाने कार्यवाही करावी. |
| ४५. | ५.१.३.२४ | केंद्र सरकारच्या केंद्रीय भाषा संस्थान, म्हैसूर ही संस्था राबवत असलेल्या राष्ट्रीय भाषांतर मोहिमेच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य भाषांतर मोहीम राबवली जाईल. | याबाबत मराठी भाषा विभागाने कार्यवाही करावी. |

—x—